**दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात**

**नियमित दिवाणी मुकदमा नं. ३८७/२०२३**

**निशाणी २० लगत आदेश**

(कविता वि. शालन व इतर)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १ हे आजरी असल्याने प्रतिवादी क्र. ३ व ४हे त्यांना दवाखान्यासाठी परगावी घेवून जात असल्याने त्यांना वेळेत म्हणणे दाखल करता आले नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द विना कैफियत चौकशी आदेश पारीत करण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांना म्हणणे दाखल करण्यास ५० दिवसांचा विलंब झालेला आहे. प्रतिवादी यांनी जाणूनबुजून विलंब केलेला नाही. सबब, प्रतिवादी यांना कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादीतर्फे सदर अर्जावरती म्हणणे देण्यात आले असून त्यांनी असे कथन केले की, प्रतिवादींचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. प्रतिवादी हे जाणूनबुजून विलंब केलेला आहे. प्रतिवादीने सबळ कारण दिलेले नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

४. वादीने सदरचा दावा हा जाहीर ठराव आणि सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेपुर संधी देण्यात यावी. जर प्रतिवादी यांच्या लेखी कैफियतीशिवाय प्रकरण चालले तर त्यांच्या हक्कास बाधा पोहचू शकते. याउलट प्रतिवादी यांना लेखी कैफियत दाखल करण्याची संधी दिली तर वादीचे अतोनात नुकसान होणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वादीस एकत्रात रु. ३००/– दंड देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वरीलप्रमाणे दंडाची रक्कम वादी यांना दिलेस प्रतिवादी यांना लेखी कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

सांगोला.
दिनांक – ३०/०१/२०२४.

(श्री. संजय मो. घुगे)
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | A. A. Chavan |
| (b) | Court | : | Shri Sanjay M. Ghuge,<br>Civil Judge, J.D.& J.M.F.C.,<br>Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 30/01/2024 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 30/01/2024 |